# मेट्रो ३ : पॅकेज ४ चे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गादरम्यानच्या सात पॅकेजपैकी पॅकेज ४च्या भुयारीकरणाचे १०० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. सिद्धिविनायक ते दादर या १.१२ किमी. लांबीच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. पॅकेज ४ अंतर्गत एकूण १०.९६ किमी. लांबीचे भुयारीकरण ३ टीबीएमच्या मदतीने पूर्ण झाले आहे. एकूण ७ पॅकेजपैकी ४ पॅकेजचे भुयारीकरण १०० टक्के पूर्ण झाले असून, या भुयारीकरणादरम्यान रस्त्यावरील वाहतूक, धार्मिक स्थळे याचा टप्पा असल्याने आव्हान होते. शहराचे मुख्य केंद्र असणारे दादर मेट्रो ३ मुळे जोडण्यात येणार असल्याने भविष्यात प्रवाशांच्या अडचणी कमी होतील, असे मत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंग देओल यांनी या वेळेस व्यक्त केले.



हेरेंक्टनेट कंपनीद्वारे बनलेले व अर्थ प्रेशर बॅलेन्स (ई.पी.बी) तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) कृष्णा-१ द्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. ७ जुलै २०२० रोजी या टप्प्याचे काम सुरू करण्यात आले होते आणि ८०५ रिंग्सचा वापर करून डाऊनलाइनचे काम पूर्ण करण्यात आले. दादर मेट्रो स्थानकाचे जवळपास ४२ टक्के काम पूर्ण झाल्याचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी सांगितले.

**नयानगर ते धारावी** (अपलाइन ५८९ मी. आणि डाऊनलाइन ५८९ मी.),
**नयानगर ते दादर** (अपलाइन २,४९१ मी. आणि डाऊनलाइन २,४७२ मी.),
**सिद्धिविनायक ते दादर** (अपलाइन - १,१०६ मी. आणि डाऊनलाइन १,१२६ मी.),
**सिद्धिविनायक ते वरळी** (अपलाइन १,३०५ मी. आणि डाऊनलाइन १,२८४ मी.)